# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२/२०२३** **दिनांक २०/०१/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शुक्रवार दि.२०/०१/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४१५०/२०२२, दि.१८.०१.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शुक्रवार दि.२०/०१/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.१०.०१.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५५** दि.१०.०१.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

**विषय नं.२** चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. डिसेंबर २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीसाठी गाईचे शुध्द तुपाची स्विस चॅलेंज पध्दतीने खरेदी करणेबाबतची वस्तुस्थिती व सदर प्रकिया पुर्ण होईपर्यंत शुध्द तुपाचे उपलब्धतेबाबत.

**निर्णय क्र.५६/१** चक्रीय पध्दतीने आणलेल्या विषयातील कार्यवाहीची प्रगती पाहिली व मा. उच्च न्यायालयाचा दि.१७/०१/२०२३ चा आदेश झाल्याचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

२. जानेवारी २०२३ महिन्यासाठी किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीबाबत.

**निर्णय क्र.५६/२** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.३** संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट (एम.बी.बी.एस.) व पोस्ट ग्रॅज्युएट (एम.डी/एम.एस/डिप्लोमा) उमेदवारांची नेमणूक करणेस व त्याकामी संस्थान रुग्णालयांना अधिकृत केंद्र म्हणून मान्यता मिळणेबाबत केलेल्या कार्यवाही बाबत.

**निर्णय क्र.५७** संस्थानचे दि.१०.१२.२०२२ रोजीचे प्रस्तावाचे पत्र दि.१४.१२.२०२२ रोजी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई समक्ष सादर केले. नंतर त्यांनी दि.१२.०१.२०२३ रोजी पाठविलेले पत्र मिळाले आणि त्याची पुर्तता दि.१६.०१.२०२३ रोजी संस्थानने केली. प्रगतीपथावर आहे. नोंद घेतली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.४** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आरएमओ /सीएमओ या पदांकरीता महिन्यातील दुस-या व चौथ्या गुरुवारी वॉक इन इंन्टरव्हयुव्दारे भरतीप्रक्रियेबाबत.

व

**विषय नं.५** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी , मॅनेजर, ज्युनिअर बायोमेडिकल इंजिनीअर यांना दि.२४.१०.२०२१ ते दि.०९.०६.२०२२ या कालावधीत

तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिनेसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका दिल्याबाबत.

**निर्णय क्र.५८** प्रस्तावाचे अवलोकन केले. एकूण पदाचे ३० टक्के पदे रिक्त झाल्यानंतर त्वरीत व्यवस्थापन/ तदर्थ समिती समोर पदभरतीसाठी मान्यतेसाठी विषय ठेवून मान्यता घेण्यात यावी. दि.२६/८/२०२२ रोजीचे बैठकीतील निर्णय क्र.४७८ मध्ये वरील प्रमाणे बदल करुन त्या निर्णयाला पुष्टी देण्यात आली. सद्या राबविलेली प्रक्रियेस प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली. दि.२६/८/२०२२ चे सभेतील निर्णय क्र. ४७९ मध्ये सदरहू परवानगी प्रस्तुत ठरावातील नेमणुका करण्यासाठी घेतलेली असून दरवर्षी नेमणुका करण्यास आगाऊ परवानगी नाही, असा खुलासा स्वीकारुन निर्णय क्र.४७९ चे निर्णयास पुष्टी देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.६** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे मशिनरी / उपकरणे / फर्निचर / इंन्स्ट्रयुमेंट / इक्विपमेंट व किरकोळ साहित्य खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.५९** नगाला नग बदलणेसाठी ते नग कालबाहय झालेमुळे नवीन खरेदीचा प्रस्ताव केला आहे किंवा एकूण गरज विचारात घेवून ते नग कमी पडणार असल्याचे पाहून प्रस्ताव केला आहे, याचा खुलासा घ्यावा. त्यासाठी मशिन्स, उपकरणे इ.ची (१) एकूण आवश्यक संख्या, (२) एकुण उपलब्ध संख्या, (३) त्यापैकी सुस्थीतीत असलेल्यांची संख्या व (४) प्रस्तावीत निर्लेखित असलेली संख्या याचा तक्ता द्यावा. सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात या बाबतची तरतुद केलेली आहे अथवा करावयाची आहे, याबाबत माहितीसह प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.७** श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री (PMJAY) जन आरोग्य योजना सुरु करणेकामी विभागांनी केलेल्या कामांबाबत.

**निर्णय क्र.६०** प्रगतीची नोंद घेतली.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.८** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी भंगार/सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र.६१** **प्रस्ताव मान्य.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.९** **संस्थानचे पॅनलवरील वकील व त्यांना दिलेले काम व त्यांनी दिलेली सेवाबाबत.**

**निर्णय क्र.६२** **(१) सद्या सेवारत आणि इच्छूक वकिलांची सेवा चालू ठेवण्यास मान्यता दिली.**
**(२) अ.नं. ११ यांचे नांव सद्या वगळण्यात यावे.**
**(३) अ.नं. २९ ॲड. जे.के. गोंदकर यांचे एलएआर प्रलंबीत असल्यामुळे आणि त्यांना वकील फी अदा करण्यात येत असल्यामुळे सद्या यापुढे त्यांना काम देवू नये.**
**(४) पॅनेलवरील उर्वरीत वकिलांची संख्या विचारात घेवून इच्छूक वकिलांपैकी किती वकिलांच्या सेवेची आवश्यक आहे याबाबतचे माहितीसह पुन्हा प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.१०** **संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२३ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रक्कम रु.३३,६२,५४९/-इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६३** **पूर्वीचे बैठकीत या विषयावर मा. सदस्य डॉ. भोसले साहेब यांनी विचारणा केली होती की, वारंवार उपयोगात येणारी व्यवस्था इतरांकडून भाडयाने घेण्यापेक्षा जर संस्थानला आर्थिकदृष्टया अशी कायमची व्यवस्था करणे परवडत असेल तर कायमची व्यवस्था करण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. व्यावहारिक नसेल तर कारणांसह तसा प्रस्ताव पुन्हा सादर करावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील शांतिनिवास, भक्तनिवास व इतर इमारती तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीटबाबत.**

**निर्णय क्र.६४** **प्रस्ताव मान्य.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **श्री साई प्रसादालयाकरीता नवीन आटा युनिट खरेदी करणेकरीता मे.हिदुस्थान ॲग्रो इंजिनिअरींग, वेरावल, गुजरात यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे सादर.**

**निर्णय क्र.६५** श्री साई प्रसादालयाकरीता नवीन आटा युनिट खरेदी करणेकरीता अभिव्यक्ती स्वारस्य मागविणेत यावे.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.१३** श्री साईबाबा संस्थानच्या सर्व इमारती व परिसरात बसविलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC)देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.६६** प्रस्ताव मान्य.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.१४** मंदिर परिसर, व्दारावती भक्तनिवास, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व रुग्णालये येथील स्प्लिट ए.सी., रेफ्रिजरेटर्स व कोल्ड स्टोअरेज यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी निविदा प्रक्रियेतील मे.कैलास रेफ्रिजरेटर्स वर्क्स, मुंबई यांचे निम्नत्तम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.६७** प्रस्ताव मान्य.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.१५** श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थाने व रुग्णालये येथील सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे लिकेज झालेल्या स्टोअरेज टॅक पाहणी अहवाल.

**निर्णय क्र.६८** पाहणी अहवालाचे अवलोकन केले. याबाबत सुरु असलेली कार्यवाही पुढे चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.१६** आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये व्यवस्थापन निधीत रक्कम रु.३५,००,३३,३४७/- वर्ग करण्यास व त्यास शासनाची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.

**निर्णय क्र.६९** अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे व्यवस्थापन खर्च १० टक्के पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. म्हणून उपाययोजना सादर करण्याचा आदेश देवून प्रस्ताव शासन मान्यतेस पाठविण्यास हरकत नाही. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

**विषय नं.१७** **संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२३ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाईकरणेकामी ई-निविदा राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.७०** **भक्तमंडळ सभासदत्व कायमनिधी पोटी व्याजासह ३८.५२ कोटीची रक्कम शिल्लक असल्याचे म्हटले आहे. त्यापैकी व्याजाचे रकमेतून खर्च भागतो आहे आणि उदीप्रसाद पाकीटातून पाठवला जाणार आहे. मागील छपाईकार यांचेकडून कोटेशन घेतलेले आहे. ते मागील दराने छापून देण्यास तयार आहेत. त्यामुळे स्विस चॅलेंज पध्दतीने त्यास मुळ प्रस्ताव देणार असे समजुन ई-निविदा राबविण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१८** **संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) बंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांना कायम स्वरुपी कामगार विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचारी कंत्राटदाराकडे वर्ग करणेबाबत.**

**निर्णय क्र.७१** **प्रकाशने विभागाच्या अहवालाचे अवलोकन केले. मुदतवाढीचा मुळ प्रस्ताव पुर्वी देत असलेल्या मानधनावर मान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१९** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम-२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत.**

**निर्णय क्र.७२** **दि.५.८.२०२२ रोजी पुवर्लक्षी प्रभावाने दि.१६.०६.२०२२ पासून जो प्रशासकीय स्तरावर निर्णय घेतला आहे तो निर्णय प्रशासनाला अधिनियमाने दिलेल्या कार्यक्षेत्रात बसत नाही. विधी व न्याय विभाग यांनी दि.२६.७.२०२२ व दि.१०.०८.२०२२ चे पत्रान्वये कळविलेल्या अभिप्रायाचे बाहेर जाऊन प्रशासकीय स्तरावर सदर निर्णय घेतलेला आहे. धोरणात्मक निर्णय तत्कालीन व्यवस्थापन समितीने घेण्याबद्दल मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.३०.११.२०२१ चे आदेशात मनाई केली होती. म्हणून सदर निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाची अवहेलना करणारा आहे. सदर आदेश घेण्याचा निर्णय मुळात तत्कालीन प्रशासनाला नसल्यामुळे कार्योत्तर मान्यता देता येत नाही. म्हणून दि.५.८.२०२२ रोजीचा प्रशासकीय निर्णय तदर्थ समिती रद्द करत आहे. कर्मचा-यांचे निवेदनावर वस्तुनिष्ठ व नियमास धरुन प्रस्ताव तदर्थ समितीसमोर सादर करावा.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२०** **संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२२-२३ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**निर्णय क्र.७३** **प्रस्ताव मान्य.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१** **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील भूसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/२०००, दि.१३.०८.२०१५ अन्वयेच्या निवाडयाप्रमाणे क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौ.मी.) चा ताबा संस्थानला मिळणेबाबत. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.३८ निर्णय क्र.२९५ रद्द करणेबाबत.**

**निर्णय क्र.७४** **तहकुब.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२२** **संस्थान निधीतून नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/ २००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूसंदर्भ क्र.३८/२०१२ दाखल केला होता, त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाच्या आधारे कलम २८अ खाली मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांनी केलेल्या निकालाच्या आधारे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५** **तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता नविन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HIMS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६** **(१) दोन्ही दवाखान्यातील एकुण बेडसंख्या ५५० असतांना देखील फक्त ३०० बेडचा उल्लेख केला. (२) टाटा कम्युनिकेशन लि., मनोरमा इंफोसोल्युशन, आय पेशंट केअर यांचेकडून दि.८.८.२०२२ रोजी प्री-बीड मिटींग मध्ये ई-मेलव्दारे प्राप्त प्रश्नांची उत्तरे तयार झाली पण देण्यात आली नाही, त्यामुळे टाटा कम्युनिकेशन लि.,यांनी भाग घेतला नाही असे दिसते. (३) वार्षिक किमान उलाढालीची सरासरी रक्कम रु.१५ कोटी**

**नियमाप्रमाणे अपेक्षीत निविदा रकमेच्या चाळीस टक्केपेक्षा जास्त ठेवली आहे. म्हणून निविदा स्पर्धात्मक व नियमानुसार नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द केली आहे. नव्याने उपरोक्त गोष्टी विचारात घेऊन योग्य तो प्रस्ताव लवकर सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **शिरडी परिक्रमा २०२३ करीता संस्थानकडून सुविधा पुरविणेबाबत तसेच परिक्रमा सांगता समारंभाकरीता शताब्दी स्टेज उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.७७** **संस्थानचे पुर्वीपासून चालत आलेल्या परंपरागत उत्सवापैकी नाही आणि नवीन धोरणात्मक निर्णय घेऊ नये असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत त्यामुळे प्रस्ताव नामंजूर.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **श्री साईबाबांच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेबाबत व १५,००० प्रसाद लाडू विकत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७८** **संस्थानचे पुर्वीपासून चालत आलेल्या परंपरागत उत्सवापैकी नाही आणि नवीन धोरणात्मक निर्णय घेऊ नये असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तसेच संस्थानकडे सध्या शुध्द तुपाचा तुटवडा आहे. त्यामुळे प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **मंदिर सुरक्षा व दर्शन व्यवस्था बाबत मा.उच्च न्यायालयासमोर पीआयएल क्र.१५/२०२० मध्ये रिपोर्ट पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.७९** **चर्चा केली. प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले की, मा.जनप्रतिनिधीनां पत्र पाठवून त्यांचे मत/सुचना देण्याची विनंती केली आहे. मा.अध्यक्ष यांनी निरिक्षण केल्यानंतर लक्षात आले की, पीआरओ रजिष्टर पाहिल्यावर असे दिसून येते की, फक्त शिफारस आली, कोणाचाही फोन आला की लगेच पास दिला जातो, येणारी व्यक्ती कोण आहे याचा, शिफारस करणारी व्यक्ती कोण आहे याचा विचार न करता आरती/दर्शनासाठी पेड पासची व्यवस्था असतांना देखील व्ही.आय.पी. पासेस देण्यात येत आहेत, याबाबत पूर्वी धोरणात्मक काही निर्णय झाला असल्यास त्याची माहिती अध्यक्षांकडे द्यावी. १९ तारखेला मा. उच्च न्यायालयात अध्यक्षांकडून अहवाल**

**पाठविणे अपेक्षित असतांना, आवश्यक माहितीअभावी वेळ मागून घेतलेली आहे. म्हणून लवकरात लवकर अहवाल पाठवावा.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग/जनसंपर्क विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.५५ ते ७९ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ७.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**